साकार समाज...राष्ट्राची दक्षता...

PRGI No.MHMAR/26/A2040

साप्ताहिक

# सूक्ष्मलोक



vitthalpatil122@gmail.com

मुख्य संपादक : विठ्ठल कौतिक पाटील | मो.9423159516



Year :1 | Issue No.: 4 | Friday Date 22 May 2026 | Jalgaon | Price : 6 | Page : 4

वर्ष १ | अंक - ४ | जळगाव | शुक्रवार | दि. २२ मे २०२६ | किंमत ६ रुपये | पृष्ठे ४


## अनुदानित खतांसोबत विनाअनुदानित खतांची सक्ती बंद

### नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाईचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांचे आदेश

मुंबई : राज्यात अनुदानित खतांच्या विक्रीसोबत विनाअनुदानित खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये, जैवखते आणि जैवउत्तेजके सक्तीने विक्री करण्याच्या प्रकारांना राज्य शासनाने तत्काळ आळा घालण्याचा निर्णय घेतला आहे. अशा प्रकारे ‘टॅगिंग’ किंवा ‘लिंकिंग’ करून शेतकऱ्यांची आर्थिक लूट होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर हा प्रकार तत्काळ बंद करण्याचे आदेश जारी करण्यात आल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे. राज्यातील काही खत उत्पादक आणि पुरवठादार कंपन्यांकडून अनुदानित खतांचा पुरवठा करताना शेतकऱ्यांना इतर विनाअनुदानित उत्पादने खरेदी करण्यास भाग पाडले जात असल्याचे निदर्शनास आले होते. भारत सरकारच्या रसायने व खते मंत्रालयाच्या खत विभागानेही अनुदानित खतांसोबत इतर उत्पादनांचे ‘टॅगिंग’ करणे बेकायदेशीर आणि अन्यायकारक असल्याचे स्पष्ट केले आहे. शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन राज्य शासनाने आता अशा सक्तीला पूर्णपणे मनाई केली आहे. शासनाच्या नवीन निर्णयानुसार, राज्यातील अनुदानित खतांचे उत्पादक आणि पुरवठादार कंपन्यांना त्यांच्या परवान्यात नमूद असलेल्या खतांव्यतिरिक्त इतर कोणत्याही विनाअनुदानित उत्पादनांचा सक्तीने पुरवठा अथवा विक्री करता येणार नाही. या आदेशाची तत्काळ अंमलबजावणी करण्याच्या सूचना कृषी आयुक्तालय, पुणे यांना देण्यात आल्या आहेत.

## हुबळी एक्स्प्रेसमध्ये प्रवाशाला लुटले


पनवेल : रेल्वे प्रवासादरम्यान अनोळखी व्यक्तींनी दिलेल्या खाद्यपदार्थांबाबत गाफील राहणे किती महागात पडू शकते, याचा प्रत्यय देणारी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. दादर ते हुबळी असा प्रवास करणाऱ्या एका ५९ वर्षीय व्यक्तीला दोन सहप्रवाशांनी गुंगीकारक काजू खायला देऊन त्यांच्याजवळ असलेले सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम लुटल्याचे उघडकीस आले आहे. गुंगीकारक काजू खाल्ल्यामुळे शुद्ध हरपलेले हे प्रवासी दुसऱ्या दिवशी शुद्धीवर आल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला.

## खड्ड्यांमुळे होणाऱ्या अपघातांचा अहवाल ७ दिवसांत द्या!

मुंबई : रस्त्यांवरील खड्डे आणि मॅनहोलमुळे अपघात किंवा मृत्यू झाल्यास मुख्य अभियंत्यांनी संबंधित यंत्रणांची बैठक घेऊन ७ दिवसांच्या आत सर्वसमावेशक अहवाल शासनाला सादर करावा, असे निर्देश सार्वजनिक बांधकाम विभागाने दिले आहेत. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार स्थापन झालेल्या समितीच्या कामकाजात सुलभता आणण्यासाठी नवीन परिपत्रक शासनाने जारी केले आहे. पूर्वी अपघातांच्या नुकसानभरपाईसंदर्भातील तक्रारींवर सचिव (रस्ते) यांच्या स्तरावर आढावा घेताना फिर्यादी, वाहनचालक, कंत्राटदार आणि अभियंता यांचे म्हणणे ऐकून घेण्यात अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर आता सर्व विभागातील मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग यांना अपघात घडताच त्वरित बैठक घेऊन तज्ज्ञांकडून माहिती एकत्रित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# विधान परिषद रणधुमाळीत पाचोऱ्यातून यंग फेसची एन्ट्री?

## राजकीय वर्तुळात सुमित पाटील यांच्या नावाची जोरदार चर्चा





**पाचोरातून विधान परिषदेसाठी युवा चेहरा ?**

**भाजपच्या रणनीतीत सुमित पाटील गेमचेंजर ठरणार?**

**जिल्हा राजकारणात नव्या समीकरणांची चाहूल!**

पाचोरा वार्ताहर : जळगाव जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधान परिषद निवडणुकीचे बिगुल वाजताच राजकीय वातावरण तापू लागले असून, विविध पक्षांमध्ये उमेदवारीसाठी जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत. अशातच पाचोरा नगरपरिषद गटनेते सुमित पाटील यांच्या नावाची राजकीय वतुर्ळात मोठ्या प्रमाणावर चर्चा रंगू लागली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपकडून नव्या चेहऱ्याला संधी दिली जाणार असल्याच्या चर्चांमध्ये सुमित पाटील हे नाव आघाडीवर असल्याचे बोलले जात आहे. नुकत्याच झालेल्या पाचोरा नगरपरिषद निवडणुकीत त्यांनी प्रभावी नेतृत्व आणि जनसंपर्काच्या जोरावर स्वतःचा स्वतंत्र ठसा उमटवला होता. त्यामुळे युवकांमध्ये तसेच स्थानिक पातळीवरील पदाधिकाऱ्यांमध्ये त्यांच्या नेतृत्वाबद्दल उत्सुकता वाढताना दिसत आहे.

राजकीय विश्लेषकांच्या मते, जिल्ह्यात बदलत्या राजकीय समीकरणांमुळे युवा नेतृत्वाला संधी देण्याची रणनीती भाजपकडून आखली जाऊ शकते. त्यातच पाचोरा-भडगाव पट्ट्यातील वाढता जनसंपर्क, सामाजिक सहभाग आणि संघटनात्मक पकड यामुळे सुमित पाटील यांची उमेदवारी डार्क हॉर्स ठरू शकते, अशी चर्चा आता खुलेआम होऊ लागली आहे.

दरम्यान, शिवसेनेकडूनही या जागेवर जोरदार दावा केला जात असून, जिल्ह्यातील काही प्रभावी नेत्यांची नावे चर्चेत आहेत. मात्र, युवक नेतृत्वाला पुढे आणण्याच्या दृष्टीने भाजपकडून सुमित पाटील यांच्या नावावर गंभीर विचार सुरू असल्याचे सूत्रांकडून समजते.

राजकीय जाणकारांच्या मते, गेल्या काही वर्षांत जिल्ह्यातील राजकारणात मोठे बदल झाले आहेत. पारंपरिक नेतृत्वासोबत नव्या पिढीतील चेहऱ्यांना संधी देण्याची मागणी वाढत असून, त्यात सुमित पाटील यांचे नाव चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहे.

अशा चर्चांमुळे आगामी विधान परिषद निवडणूक अधिक रंगतदार होण्याची चिन्हे दिसू लागली असून, जिल्ह्याचे राजकारण आता नव्या वळणावर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# पेट्रोल-डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध !



मुंबई : जागतिक स्तरावर इंधन पुरवठ्याची स्थिती वाईट असतानाही आपल्याकडे पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. पंपांवर गर्दी करून इंधनाचा तुटवडा असल्याच्या अफवांवर विश्वास न ठेवता जनतेने इंधनाचा जबाबदारीने वापर करावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

राज्यात काही ठिकाणी पेट्रोल पंपांवर रांगा लावून लोक पेट्रोल-डिझेल खरेदी करत असल्याच्या तसेच त्यावरून वाद, मारामारी झाल्याच्या बातम्या आल्या आहेत. यासह विविध विषयांवर मुख्यमंत्री फडणवीस प्रसारमाध्यमांशी बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे परदेशात जाऊन देशहिताचे निर्णय घेत आहेत, अशा शब्दात ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी पंतप्रधानांचे कौतुक केले आहे. त्याबाबत फडणवीस म्हणाले, शरद पवार यांनी जे काही सांगितले ते महत्त्वाचे आहे. अनेक लोक पंतप्रधान परदेशात का गेले, तिथे काय केले अशी टीका करत होते. त्या वेळी विविध देशांसोबत पंतप्रधान मोदी हे महत्त्वाचे करार करत होते. त्यामुळे पुढच्या १५-२० वर्षांचे आपले भवितव्य सुरक्षित झाले. त्यामुळे शरद पवार म्हणाले की, विनाकारण टीका करू नका, ते परदेशात जाऊन देशहिताचे काम करत आहेत, त्यावर टीका करणे योग्य नाही.

**पुन्हा सांगतो राहुल गांधी रिजेक्टेड माल**

मी आधी राहुल गांधींवर टीका केली होती, त्याचे शब्द शरद पवार यांना आवडले नव्हते. पण मी पुन्हा एकदा म्हणेन की राहुल गांधी हे रिजेक्टेड माल आहेत, असे फडणवीस म्हणाले. राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर केलेल्या टीकेवर त्यांनी हे प्रत्युत्तर दिले.

## अफवांवर विश्वास न ठेवता इंधन जबाबदारीने वापरण्याचे मुख्यमंत्र्यांचे आवाहन

**सरकारच्या ९२ टक्के निर्णयांची अंमलबजावणी**

मंत्रिमंडळासमोर राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयांची किती आणि कशी अंमलबजावणी झाली याचे आपण सादरीकरण घेतले. प्रत्येक विभागाने घेतलेले ९२ टक्के निर्णय पूर्णपणे कार्यान्वित झाले आहेत. ८ टक्के निर्णय हे राज्यपाल किंवा राष्ट्रपतींकडे कायद्याच्या स्वरूपात प्रलंबित आहेत. काही निर्णयांत दोन-तीन विभागांचा सहभाग असल्याने प्रलंबित आहेत, असे मुख्यमंत्री म्हणाले.

# ‘सीएसआर’ निधीतून महाराष्ट्रात प्रगतीचा नवा अध्याय : मुख्यमंत्री



मुंबई : सामाजिक उत्तरदायित्व निधीच्या (सीएसआर) माध्यमातून देशात दरवर्षी सुमारे ३६ हजार कोटी रुपये खर्च केले जातात आणि हा निधी खर्च करण्यात महाराष्ट्र अव्वल स्थानी आहे. सीएसआर निधीच्या उपयोगातून समाजात शासकीय योजनांचा प्रभाव अनेक पटीने वाढवून शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचवला जात असल्याने महाराष्ट्रात प्रगतीचा नवा अध्याय लिहिला जात आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाच्या वतीने आयोजित ‘टेक महा इम्पॅक्ट’ परिषदेत मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मंत्री आशिष शेलार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव परिमल सिंग आदी अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले, राज्यातील सर्वाधिक सीएसआर निधी मुंबई-पुण्यात खर्च होतो; पण तो संपूर्ण राज्यात वापरण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. ‘व्हिलेज सोशल ट्रान्सफॉर्मेशन इनिशिएटिव्ह’ अंतर्गत १ हजार गावांचा कायापालट करण्यात आला. कंपन्या केवळ निधी न देता नवीन तंत्रज्ञान आणत आहेत. शासनासोबत भागीदारी करताना सीएसआर निधीतील प्रत्येक पैशाचा वापर थेट सर्वसामान्यांच्या कल्याणासाठीच केला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

**‘सीएसआर’मधून महाराष्ट्र अधिक समृद्ध होणार**

महाराष्ट्र हे देशाचे वित्तीय इंजिन असून तंत्रज्ञान, नवोपक्रम आणि सीएसआर निधीच्या समन्वयातून राज्य अधिक समृद्ध होणार असल्याचा विश्वास उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केला. जोपर्यंत शासन, तंत्रज्ञान आणि कॉर्पोरेट क्षेत्र एकत्र येत नाहीत, तोपर्यंत प्रगती शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणार नाही, असेही त्या म्हणाल्या.

**सर्वसामान्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल**

सीएसआरच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडेल, असे प्रतिपादन आशिष शेलार यांनी केले. देवेंद्र फडणवीस हे तंत्रज्ञानाची सखोल जाण असणारे आघाडीचे मुख्यमंत्री आहेत. राज्यातील विविध विकासकामांसाठी २४ आघाडीच्या कंपन्या आणि संस्थांसोबत सामंजस्य करार झाले असून त्यातून १५५ कोटी रुपयांचे योगदान महाराष्ट्राला लाभणार आहे, अशी माहितीही त्यांनी दिली.

साप्ताहिक
सूक्ष्मलोक

शुक्रवार, दि.२२ मे २०२६

# संपादकीय

## संतांच्या विचारांचा समृद्ध वारसा

महाराष्ट्राचा गौरवशाली इतिहास हा केवळ पुस्तकातील पानांवर मर्यादित नसून, तो इथल्या गडकिल्ल्यांच्या दगडाधोंड्यांमध्ये, मंदिरांच्या कळसांमध्ये आणि संतांच्या भूमीत भक्कमपणे उभा आहे. हा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा म्हणजेच राज्याची खरी अस्मिता आणि वैभव! तत्राप, काळाच्या ओघात आणि योग्य देखभालीअभावी त्यातील अनेक स्थळे उपेक्षित राहिली होती. या पार्श्वभूमीवर, राज्य सरकारने राज्यातील सहा ऐतिहासिक, धार्मिक स्थळे आणि गडकिल्ल्यांच्या जतन व संवर्धनासाठी तब्बल ९९३ कोटी ७२ लाख रुपयांच्या भरीव निधीला आणि विकास आराखड्यांना मंजुरी देणे, हा अत्यंत स्वागतार्ह आणि दूरगामी निर्णय आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या तीर्थक्षेत्र विकास आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश देतानाच, भाविक आणि पर्यटकांसाठी अत्याधुनिक सोयी-सुविधा आणि आरोग्य सुविधांची उपलब्धता दर्जेदार व कालमर्यादेत पूर्ण करण्याचे बजावले आहे. हा केवळ एका निधीचा आकडा नसून, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक पुनरुत्थानाचा आणि पर्यटन क्षेत्राला आर्थिक गती देणारा एक महत्त्वाचा दस्तऐवज आहे, असे म्हटले तर ते अजिबात वावगे ठरणार नाही.

महाराष्ट्राला छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचा आणि संतांच्या विचारांचा समृद्ध वारसा लाभला आहे. या मातीतील गडकिल्ले आणि धार्मिक स्थळे लाखो-कोट्यवधी जनतेच्या अस्मितेचा आणि श्रद्धेचा भाग आहेत. आजवर या स्थळांच्या विकासासाठी तुकड्या-तुकड्याने निधी दिला जात होता, ज्यामुळे कोणतीही शाश्वत प्रगती दिसून येत नसे. परंतु, आता एकाच वेळी सुमारे एक हजार कोटी रुपयांचा सर्वसमावेशक विकास आराखडा मंजूर केल्यामुळे या स्थळांचा कायापालट होण्यास मोठी मदत होणार आहे. या निर्णयामुळे केवळ ऐतिहासिक वास्तूंचे जतन होणार नाही, तर भावी पिढीला हा देदीप्यमान इतिहास अधिक प्रभावीपणे अनुभवता येईल.

या विकास आराखड्याचा आर्थिक दृष्टीकोनातून विचार करणे अत्यंत गरजेचे आहे. आज जागतिक स्तरावर 'पर्यटन अर्थव्यवस्था' हा कोणत्याही देशाच्या किंवा राज्याच्या जीडीपीचा एक मुख्य स्तंभ मानला जातो. धार्मिक आणि ऐतिहासिक पर्यटनामध्ये रोजगार निर्मितीची प्रचंड क्षमता असते. जेव्हा एखाद्या तीर्थक्षेत्राचा किंवा गडकिल्ल्याचा विकास होतो, तेव्हा तिथे केवळ पर्यटकांची संख्या वाढत नाही, तर स्थानिक पातळीवर अर्थव्यवस्थेला मोठी गती मिळते. हॉटेल व्यवसाय, वाहतूक व्यवस्था, स्थानिक हस्तकला, मार्गदर्शक आणि छोटे-मोठे व्यावसायिक अशा अनेक घटकांना थेट रोजगार मिळतो. ९९३ कोटी रुपयांची ही गुंतवणूक भविष्यात राज्याला हजारो कोटी रुपयांचा महसूल आणि लाखो रोजगार मिळवून देणारी ठरू शकते. त्यामुळे या निधीकडे केवळ खर्च म्हणून न पाहता, ती राज्याच्या शाश्वत विकासासाठी केलेली एक गुंतवणूक म्हणून पाहिले पाहिजे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या निर्देशात अत्याधुनिक सोयी-सुविधा आणि कालमर्यादा या दोन अत्यंत महत्त्वाच्या मुद्द्यांवर भर दिला आहे. आजचा पर्यटक किंवा भाविक हा केवळ दर्शनासाठी येत नाही, तर तिथल्या एकूण अनुभव त्याच्यासाठी अंमळ अधिक महत्त्वाचा ठरतो. अनेकदा आपल्याकडील प्रमुख धार्मिक आणि ऐतिहासिक स्थळांवर पायाभूत सुविधांचा प्रचंड अभाव जाणवतो. पिण्याचे शुद्ध पाणी, स्वच्छ प्रसाधनगृहे, दर्जेदार रस्ते, पार्किंगची व्यवस्था आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आपत्कालीन वैद्यकीय सुविधा यांची मोठी कमतरता असते. विशेषतः गडकिल्ल्यांवर चढताना किंवा दुर्गम भागातील मंदिरांमध्ये पर्यटकांच्या सुरक्षेचा आणि आरोग्याचा प्रश्न अनेकदा ऐरणीवर येतो. या अनुषंगाने मुख्यमंत्र्यांनी आरोग्य सुविधांची उपलब्धता दर्जेदार ठेवण्याचे दिलले आदेश अत्यंत समयोचित आहेत.

अर्थात, कोणत्याही चांगल्या योजनेचे यश हे तिच्या कागदावरील आराखड्यापेक्षा तिच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीवर अवलंबून असते. आपल्या देशात निधी मंजूर होणे ही मोठी गोष्ट नाही, तर तो निधी वेळेत आणि प्रामाणिकपणे खर्च होणे हे मोठे आव्हान असते. लालफितीच्या कारभारात अनेकदा प्रकल्प रखडतात, त्यामुळे प्रकल्पांचा खर्च तर वाढतोच, पण पर्यटकांनाही नाहक त्रास सहन करावा लागतो. ताजा निधी सहा विशिष्ट स्थळांसाठी आहे, त्यामुळे प्रत्येक स्थळासाठी एका स्वतंत्र आणि सक्षम यंत्रणेची नियुक्ती केली गेली पाहिजे. हे काम आंतरराष्ट्रीय दर्जाचे असावे आणि त्यात कुठेही भ्रष्टाचार किंवा दिरंगाई होणार नाही, याची काळजी प्रशासनाला घ्यावी लागेल. या संवर्धनाच्या कामात आणखी एका गोष्टीची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे, ती म्हणजे ऐतिहासिक मूळ रूप टिकवणे! गडकिल्ल्यांचे किंवा प्राचीन मंदिरांचे जतन करताना आधुनिक सिमेंट-काँक्रीटचा अतिवापर अनेकदा त्यांचे सौंदर्य आणि ऐतिहासिक महत्त्व नष्ट करतो. पुरातत्त्व शास्त्राच्या नियमांचे काटेकोर पालन करून, जुन्याच बांधकाम साहित्याचा व पद्धतींचा वापर करून संवर्धन झाले पाहिजे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर हा केवळ पर्यटकांच्या सुविधेसाठी व्हावा, वास्तूच्या मूळ ढाच्याला ढवळून टाकण्यासाठी नव्हे! इतिहासतज्ज्ञ, पुरातत्त्व शास्त्रज्ञ आणि स्थानिक नागरिक यांना या प्रक्रियेत सामावून घेतले तर हे काम निश्चितच अधिक दर्जेदार आणि त्रुटीविरहित होऊ शकेल.

असो. प्रस्तुत विकास आराखडा म्हणजे महाराष्ट्राच्या अस्मितेचा सन्मान आहे. गडकिल्ले आणि तीर्थक्षेत्रे ही केवळ दगडांची बांधकामे नसून ती महाराष्ट्राची ऊर्जाकेंद्रे आहेत. राज्य सरकारने घेतलेला हा निर्णय कौतुकास्पद असला तरी आता खरी जबाबदारी प्रशासनाची आणि अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेची आहे. ९९३ कोटी ७२ लाख रुपयांचा निधीतून जेव्हा महाराष्ट्राच्या वैभवशाली वारशाचे एक नवे, देखणे रूप जगासमोर येईल, तेव्हाच या निर्णयाचे खऱ्या अर्थाने सोने होईल. मुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार, हा विकास वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण होऊन महाराष्ट्राचे पर्यटन जागतिक नकाशावर अधिक ठळकपणे चमकेल, अशी आशा उरी दाटलेली आहेच..!

# लाचखोरांचा 'बाजार'च उठवला! येवल्यात 8 वनकर्मचारी ताब्यात

### नाशिकसह संपूर्ण राज्यातील वनविभागाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले असून प्रशासकीय वतुर्ळात एकच खळबळ उडाली आहे

नाशिक : शासकीय यंत्रणांमध्ये बोकाळलेल्या लाचखोरीचा आणखी एक अत्यंत धक्कादायक आणि लाजिरवाणा प्रकार नाशिक जिल्ह्यात समोर आला आहे. येवल्यात नाशिक एसीबीने मोठी कारवाई केली असून वनपरिक्षेत्र विभागात तब्बल आठ कर्मचारी एसीबीच्या जाळ्यात अडकल्यामुळे एकच खळबळ उडाली. एकाच कार्यालयातील एवढ्या मोठ्या संख्येने कर्मचारी लाच घेताना पकडले जाण्याची ही जिल्ह्यातील कदाचित पहिलीच मोठी घटना असावी.




**नाशिक जिल्ह्यात प्रचंड खळबळ**

नाशिक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (अउइ) लाचखोरांविरुद्ध आतापर्यंतची सर्वात मोठी आणि धडाकेबाज कारवाई केली आहे. येवला वनपरिक्षेत्र कार्यालयाच्या हद्दीत झाडे तोडण्याच्या परवानगीसाठी लाच मागणाऱ्या तब्बल आठ कर्मचाऱ्यांना एसीबीच्या पथकाने रंगेहात ताब्यात घेतले आहे. या कारवाईमुळे नाशिकसह संपूर्ण राज्यातील वनविभागाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले असून प्रशासकीय वतुर्ळात एकच खळबळ उडाली आहे.

**काय आहे प्रकरण?**

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, तक्रारदाराला त्यांच्या वनपरिक्षेत्र हद्दीतील काही झाडे तोडण्यासाठी अधिकृत परवानगी हवी होती. नियमानुसार काम असतानाही, येवला वनविभागातील कर्मचाऱ्यांनी यासाठी मोठ्या लाचेची मागणी केली. लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदाराने थेट नाशिक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे (एसीबी) याबाबत रीतसर तक्रार नोंदवली.

**सापळा रचला अन आठ जण अडकले**

एसीबीच्या पथकाने तक्रारीची पडताळणी केल्यानंतर येवला वनपरिक्षेत्र कार्यालयात अत्यंत गोपनियतेने सापळा रचला. ठरल्याप्रमाणे तक्रारदाराकडून लाचेची रक्कम स्वीकारताना एसीबीच्या पथकाने छापा टाकला आणि एकापाठोपाठ एक अशा आठ जणांना जाळ्यात सापडले.

या कारवाईची बातमी वाऱ्यासारखी पसरताच येवला परिसरात खळबळ उडाली. एसीबीने ताब्यात घेतलेल्यांची कसून चौकशी सुरू केली आहे.

या कारवाईत वनविभागाचे कोणते मोठे अधिकारी किंवा कर्मचारी सामील आहेत, त्यांची नावे अद्याप अधिकृतपणे जाहीर करण्यात आलेली नाहीत. मात्र, संशयितांमध्ये काही वरिष्ठ अधिकाऱ्यांचाही समावेश असण्याची दाट शक्यता सूत्रांनी वर्तवली आहे. सर्व संशयितांवर काल रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. एकाच वेळी 8 शासकीय कर्मचारी लाचखोरीत अडकल्यामुळे

# अवकाळीग्रस्त जिल्ह्याला मोठा दिलासा

### ३७ हजार ९९१ शेतकऱ्यांसाठी ३१ कोटी १४ लाखांची मदत मंजूर; पालकमंत्र्यांच्या पाठपुराव्याला यश, १८ हजार हेक्टरहून अधिक क्षेत्र बाधित

जळगाव : मार्च २०२६मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस व अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना राज्य शासनाने मोठा दिलासा दिला आहे. जिल्ह्यासाठी तब्बल ३१ कोटी १४ लाख ६० हजार रुपयांची मदत मंजूर केली आहे. या मदतीमुळे जिल्ह्यातील ३७ हजार ९९१ शेतकऱ्यांना थेट लाभ मिळणार आहे.



शासन निर्णयानुसार जिल्ह्यातील १८ हजार २२९.७३ हेक्टर क्षेत्र अवकाळी पावसामुळे बाधित झाले होते. पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी ३० एप्रिल रोजी शासनाकडे मदतीचा प्रस्ताव सादर केला होता. त्यानुसार २७ मार्च २०२३च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार ही मदत मंजूर करण्यात आली. राज्य शासनाने राज्यातील विविध जिल्ह्यांतील बाधित शेतकऱ्यांसाठी एकूण १६४ कोटी ८३ लाख ४४ हजारांची मदत मंजूर केली आहे. त्यामध्ये जळगाव जिल्ह्यासाठी ३१ कोटी १४ लाख ६० हजारांची तरतूद करण्यात आली आहे. शासन निर्णयातील विवरणपत्रानुसार जळगाव जिल्ह्यातील बाधित शेतकरी संख्या आणि क्षेत्रफळाच्या दृष्टीने ही मोठी मदत मानली जात आहे. दरम्यान, अवकाळी पावसानंतर पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी स्वतः बाधित भागांचा दौरा केला. तसेच शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी केली होती. तसेच जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, खासदार स्मिता वाघ तसेच जिल्ह्यातील सर्व आमदारांनी बाधित भागांना भेटी देऊन परिस्थितीची माहिती घेत शासनाकडे मदतीची मागणी केली होती. त्यानंतर पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी सर्व लोकप्रतिनिधींच्या सहकार्याने शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता.

# नांदेड- एलटीटी साप्ताहिक एक्स्प्रेसला चाळीसगावात थांबा

चाळीसगाव : मुंबई आणि मराठवाडा दरम्यान प्रवास करणाऱ्या रेल्वे प्रवाशांसाठी आनंदाची बातमी असून नांदेड ते लोकमान्य टिळक टर्मिनस (एलटीटी) दरम्यान नवीन साप्ताहिक एक्सप्रेस सेवा सुरू करण्यात आली आहे. विशेष म्हणजे या एक्सप्रेसला चाळीसगाव रेल्वे स्थानकावर अधिकृत थांबा दिल्याने खान्देशातील प्रवाशांची मोठी सोय होणार आहे.

रेल्वे प्रशासनाच्या मान्यतेनुसार गाडी क्रमांक १७६६५ व १७६६६ ही नांदेड ते एलटीटी ते नांदेड साप्ताहिक उद्घाटन फेरी १९ मे रोजी धावणार आहे. तर नियमित सेवा २५ मेपासून सुरू होणार आहे. तसेच गाडी क्रमांक १७६६७ व १७६६८ ही अतिरिक्त साप्ताहिक सेवा २० मेपासून सुरू करण्यात येणार आहे. या एक्स्प्रेसला पूर्णा, वसमत, हिंगोली, डेक्कन, वाशीम, अकोला, मलकापूर, भुसावळ, चाळीसगाव, मनमाड, नाशिक रोड, इगतपुरी आणि कल्याण या महत्त्वाच्या स्थानकांवर थांबे देण्यात आले आहेत. एलटीटीहून सुटणाऱ्या गाडी क्रमांक १७६६५ आणि १७६६७ या गाड्या प्रत्येक सोमवार व बुधवारी धावणार आहेत. तर नांदेडहून सुटणाऱ्या गाडी क्रमांक १७६६६ आणि १७६६८ या गाड्या प्रत्येक मंगळवार व गुरुवारी रवाना होणार आहेत. या नव्या रेल्वेसेवेचा लाभ मुंबई, नाशिक, मनमाड, चाळीसगाव, भुसावळ आणि नांदेड मार्गावरील हजारो प्रवाशांना होणार असून मराठवाडा आणि खान्देशातील प्रवास अधिक सोयीस्कर होणार आहे.

# महिला शक्तीचा भाजपात नवा दमदार चेहरा भडगाव महिला मोर्चाची भव्य कार्यकारिणी जाहीर

## भाजपा महिला मोर्चा मंडळ अध्यक्षा म्हणून योजनाताई पाटील यांच्यावर पुन्हा विश्वास

भडगाव (प्रतिनिधी) : भडगाव शहर व तालुक्यातील महिला संघटनाला नवसंजीवनी देणारी भारतीय जनता पार्टी जळगाव पश्चिम भडगाव मंडळ महिला मोचार्ची नवी कार्यकारिणी मोठ्या उत्साहात जाहीर करण्यात आली आहे. महिला सक्षमीकरण, संघटन मजबुती आणि गावागावात पक्ष विचार पोहोचविण्याच्या उद्देशाने ही कार्यकारिणी तयार करण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या आदेशान्वये तथा मा. ना. गिरीश महाजन, प्रदेश महामंत्री राजेश पांडे, मुख्यालय प्रभारी रवि अनासपुरे, प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ, खासदार स्मिता वाघ, आमदार मंगेश चव्हाण, जिल्हाध्यक्ष डॉ. राधेश्याम चौधरी, महिला अध्यक्षा अड. कृतिका आफ्रे तसेच भडगाव मंडळ अध्यक्ष विनोद नेरकर यांच्या मान्यतेने ही कार्यकारिणी घोषित करण्यात आली. भाजपा महिला मोर्चा मंडळ अध्यक्षा म्हणून योजनाताई पाटील यांच्यावर पुन्हा विश्वास दाखविण्यात आला आहे.



**महिला नेतृत्वाला मिळाले नवे बळ**

उपाध्यक्षपदी गायत्री बिरारी, सुनिता शिंपी, शिला पाटील, सुनिता चौधरी, सोनाली चौधरी, मोनाली बागल, नसीम बानो पठाण यांची निवड करण्यात आली आहे.

सरचिटणीसपदी चंदा पाटील, रंजना परदेशी, मनिषा पाटील, सुनिता माळी तर चिटणीसपदी भावना राजपूत, हेमलता शिंपी, ज्योती पाटील, शारदा पाटील, मिनाक्षी पाटील, सुनिता पाटील, निता भंडारकर यांना संधी देण्यात आली आहे.

शहराध्यक्षपदी योगिता वाघ, कोषाध्यक्षपदी मनिषा पाटील, प्रसिद्धी प्रमुखपदी मिनाक्षी पाटील तर सोशल मीडिया प्रमुखपदी रूपाली पाटील यांची नियुक्ती करण्यात आली.

**गावागावातून महिलांचा उत्स्फूर्त सहभाग**

कार्यकारिणीत विविध समाजघटक, ग्रामीण भाग आणि शहरातील महिलांचा मोठ्या प्रमाणावर समावेश करण्यात आला आहे. यात मनिषा पाटील, कविता पाटील, सुरेखा वाघ, उषा परदेशी, आशा पाटील, चित्रा मालपुरे, प्रियंका भिल, पुष्पांजली पवार, पूनम बोरसे, वैशाली पाटील, स्वाती चौधरी, नेहा राजपूत, कोमल बागल, यास्मिन शेख, खालेदा खान, निता जाधव, सुवर्णा पाटील, ज्योती पाटील, नूतन पाटील, रेणुका मिस्त्री, कामिनी सोमवंशी, अश्विनी भदाणे, पूजा पाटील, दीपमाला जाधव, स्मिता पाटील, माया मोरे, नम्रता सोमवंशी, संगीता पवार, वर्षा पाटील आदींसह अनेक महिलांची कार्यकारिणी सदस्य म्हणून निवड जाहीर करण्यात आली आहे.

**नेत्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव**

सदर कार्यकारिणीचे मा. आमदार दिलीप वाघ, महिला नेत्या वैशालीताई सूर्यवंशी, युवानेते अमोलभाऊ शिंदे, किसान संस्थेचे चेअरमन प्रतापराव पाटील तसेच पी.टी.सी. चेअरमन संजयजी वाघ यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

भडगाव तालुक्यात भाजपा महिला मोर्चा अधिक आक्रमक, संघटित आणि जनसंपर्कात सक्रिय दिसणार असल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात रंगू लागली आहे.

---

# शेतकऱ्यांच्या घामाला शासनाचा न्याय कधी?


## १० लाखांच्या अनामत अटीमुळे हरभरा खरेदी ठप्प

### भडगाव शेतकरी संघात संताप; शासनाने तातडीने दखल घेण्याची मागणी

भडगाव प्रतिनिधी : राज्य शासनाच्या नव्याने लागू करण्यात आलेल्या हरभरा खरेदी प्रक्रियेमधील १० लाख रुपयांच्या अनामत रकमेच्या अटीमुळे भडगाव परिसरातील शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले असून शासनाने तातडीने हस्तक्षेप करून ही अट रद्द करावी, अशी मागणी शेतकरी व सहकारी संस्थांकडून जोर धरू लागली आहे.

भडगाव शेतकरी सहकारी संघामार्फत हरभरा खरेदीसाठी ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाली होती. मात्र अचानक शासनाने १० लाख रुपये अनामत रक्कम भरण्याची अट घातल्याने संपूर्ण प्रक्रिया अडचणीत आली आहे. त्यामुळे शेकडो शेतकऱ्यांचे हरभरा विक्रीचे व्यवहार रखडले असून संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सन २००९ पासून विविध योजनांमध्ये शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे आश्वासन दिले जात असताना प्रत्यक्षात मात्र नव्या आर्थिक अटी लादून शेतकऱ्यांवर अन्याय केला जात असल्याची भावना शेतकरी वगार्तून व्यक्त होत आहे. आधी ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया सुरू करून नंतर अचानक आर्थिक अट लादणे म्हणजे शेतकऱ्यांची थट्टाच असल्याची प्रतिक्रिया अनेकांनी व्यक्त केली.



भडगाव शेतकरी सहकारी संघाचे पदाधिकारी, व्यापारी व शेतकरी यांनी शासनाच्या या निर्णयाचा निषेध व्यक्त केला असून तातडीने निर्णय मागे न घेतल्यास आंदोलनाचा इशाराही दिला आहे.

विशेष म्हणजे जिल्हा पणन अधिकाऱ्यांनी संबंधित संस्थांना अनामत रक्कम जमा करण्याचे आदेश दिल्याची चर्चा असून, त्यामुळे शेतकरी अधिक संभ्रमात सापडले आहेत. अनेक शेतकऱ्यांनी शासनाने तातडीने दखल घेऊन हरभरा खरेदी प्रक्रिया सुरळीत करावी व शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी केली आहे.

**शासनाने तातडीने निर्णय घ्यावा**

शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी लक्षात घेऊन हरभरा खरेदीवरील अनामत रकमेची अट त्वरित रद्द करून खरेदी प्रक्रिया सुरू करावी, अन्यथा शेतकऱ्यांचा रोष तीव्र होईल, अशी भावना परिसरात व्यक्त होत आहे

# बोदवडमध्ये चाकूहल्ल्यात युवकाचा मृत्यू

बोदवड : शहरातील अन्सार पिंजारी यांच्यावर झालेल्या चाकू हल्ल्यात त्यांचा जागीच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. गत चार दिवसांपूर्वी अन्सार पिंजारी यांच्या घरात चोरीची घटना घडली होती. याप्रकरणी त्यांनी बोदवड पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दाखल केली होती. या तक्रारीचा राग मनात धरून अबरार शाह याने अन्सार पिंजारी यांच्यावर धारदार चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात अन्सार पिंजारी गंभीर जखमी झाले होते. या घटनेनंतर जखमी अवस्थेत त्यांना तातडीने बोदवडच्या ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करुन त्यांना मृत घोषित केले. ही बातमी समजताच कुटुंबियांनी रुग्णालयात मोठा आक्रोश केला. दरम्यान, या घटनेनंतर परिसरात संतापाची लाट उसळली असून आमदारांनी बोदवड पोलीस ठाण्यामध्ये ठिय्या आंदोलन करत आरोपीवर कठोर कारवाईची मागणी केली. परंतु, अद्यापपर्यंत कुठलीही कारवाई करण्यात आलेली नव्हती.

---


# हरभरा नोंदणी २८३ शेतकऱ्यांची, खरेदी मात्र वाऱ्यावर!

## १० लाखांच्या अनामतीचे जिल्हा पणनचे पत्र; आधीच तोट्यात असलेल्या भडगाव संघाकडून 'अनामत भरणार कोण?' असा सवाल

भडगाव : शासनाच्या नाफेड अंतर्गत शासकीय हरभरा खरेदीसाठी येथील शेतकरी सहकारी संघामार्फत एकूण २८३ शेतकऱ्यांनी ऑनलाईन नाव नोंदणी केली आहे. मात्र, नोंदणी होऊनही खरेदी आणि मोजणीचे आदेश रखडल्याने शेतकरी सध्या चिंतेत आहेत. त्यातच राज्य शासनाच्या निर्देशानुसार सबएजंट संस्थांना १० लाख रुपये अनामत रक्कम भरण्याचे आदेश जिल्हा पणन कार्यालयाकडून आल्याने नवा पेच निर्माण झाला आहे. आधीच तोट्यात असलेल्या भडगाव शेतकरी सहकारी संघाने ही अनामत रक्कम भरण्यास असमर्थता दर्शवली असून, शासनाचे हे धोरण अत्यंत चुकीचे असल्याचा सूर शेतकरी आणि संस्था चालकांमधून निघत आहे.

**आधी सांगितले असते तर नोंदणीच केली नसती!**

दि. महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन लि. मुंबई आणि जिल्हा पणन अधिकारी कार्यालय, जळगाव यांच्या लेखी पत्रान्वये १० लाख रुपये अनामत रक्कम भरण्याबाबतचे आदेश



यापुर्वीच प्राप्त झाले आहेत. यावर भडगाव शेतकरी सहकारी संघाच्या पदाधिकाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. जिल्हा पणन अधिकाऱ्यांनी शासनाच्या या १० लाख रुपयांच्या अनामतीबद्दल सुरुवातीलाच स्पष्ट केले असते, तर आम्ही शेतकऱ्यांची ऑनलाईन नाव नोंदणी सुरूच केली नसती. आमचा शेतकरी सहकारी संघ आधीच आर्थिक तोट्याच्या सकटात अडकलेला आहे. अशा परिस्थितीत ही १० लाख रुपयांची अनामत रक्कम कुठून आणि कोण भरणार? असा संतप्त सवाल संघाचे पदाधिकारी करत आहेत.

**हमीभाव चांगला, पण शासकीय धोरणामुळे कोंडी**

शासनाने हरभऱ्याला प्रति क्विंटल ५,८७५ रुपये असा चांगला हमीभाव जाहीर केला आहे. बाजारभावापेक्षा चांगला दर मिळत असल्याने भडगाव तालुक्यातील हरभरा उत्पादक शेतकऱ्यांनी शासकीय खरेदी केंद्राकडे धाव घेतली. १ मार्चपासून ही ऑनलाईन नाव नोंदणी सुरू करण्यात आली होती. त्यानंतर शासनाने मुदतवाढ देत ती १९ एप्रिल २०२६ पर्यंत वाढवली होती. या मुदतीत तालुक्यातील २८३ शेतकऱ्यांनी आपली नावे नोंदवली. मात्र, आता अनामतीच्या जाचक अटीमुळे ही खरेदीच धोक्यात आल्याने ऑनलाईन नोंदणी करून आमचा फायदा काय? शासनाने जणू आमची थट्टाच मांडली आहे,अशी भावना शेतकरी व्यक्त करत आहेत.

आता अनामत रक्कम भरण्याची मुदत संपून गेलेली आहे. शेतकरी सहकारी संघाच्या संचालक मंडळाने वेळीच यावर ठोस पावले उचलणे गरजेचे होते, अशीही चर्चा आता सुरु झाली आहे. या संपूर्ण घोळाला जबाबदार कोण? शासन की शेतकरी संघ? असा प्रश्न संतप्त शेतकरी विचारत असून, आता शासन यावर काय निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**मंत्र्यांशी चर्चा करून मार्ग काढू!**

हरभरा खरेदीसाठी १० लाख रुपयांची अनामत रक्कम मागण्याचे पणन अधिकाऱ्यांचे पत्र संघाला मिळाले आहे. भडगावप्रमाणेच पाचोरा केंद्राचीही हीच परिस्थिती आहे. संस्थांची अनामत भरण्याची क्षमता नाही. हे शासकीय धोरण चुकीचे असून, मी या संदर्भात वरिष्ठ पातळीवर आणि थेट पणन मंर्त्यांशी चर्चा करणार आहे. शेतकऱ्यांचा हरभरा शासकीय दराने खरेदी व्हावा यासाठी शासनदरबारी पूर्ण ताकदीने प्रयत्न करू आणि शेतकऱ्यांना न्याय मिळवून देऊ.

आ. किशोर पाटील

**शासनाने तात्काळ निर्णय घेऊन खरेदी सुरू करावी**

भडगाव शेतकरी सहकारी संघाची आर्थिक स्थिती आधीच तोट्यामुळे खालावलेली आहे. १० लाख रुपयांची अनामत रक्कम भरण्याची परिस्थिती नाही. २८३ शेतकऱ्यांनी विश्वासाने ऑनलाईन नोंदणी केली आहे, त्यांचा हरभरा तात्काळ खरेदी केला जावा.

— **राजेंद्र परदेशी** चेअरमन, शेतकरी संघ, भडगाव

**मुदत संपली, 'आयडी' बंद होण्याची टांगती तलवार!**

प्रभारी जिल्हा पणन अधिकारी एस. एस. मेने यांच्या स्वाक्षरीने २५ मार्च २०२६ रोजी भडगाव संघाला पत्र प्राप्त झाले होते. या पत्रात नमूद करण्यात आले होते की, जिल्ह्यातील एकूण १२ खरेदी केंद्रांपैकी केवळ ३ केंद्रांनी अनामत रक्कम बँकेत जमा केली आहे. उर्वरित ९ केंद्रांना ३१ मार्च २०२६ पर्यंत रक्कम भरण्याची अंतिम मुदत देण्यात आली होती. मुदतीत रक्कम न भरल्यास खरेदी केंद्रांचे 'लॉगिन आयडी' १ एप्रिलपासून बंद करण्यात येतील, असा इशाराही देण्यात आला होता.

# महिलांच्या नेतृत्वाला नवी धार ; भाजपा महिला भडगाव शहराध्यक्षपदी योगिता वाघ यांची दमदार एन्ट्री

भडगाव प्रतिनिधी : भारतीय जनता पक्षाच्या संघटनात्मक बांधणीला अधिक बळकटी देण्यासाठी पक्षाकडून विविध पदांवर नव्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या असून, भाजपा महिला आघाडीच्या भडगाव शहराध्यक्षपदी सौ. योगिता अनिल वाघ यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे भडगाव शहरातील महिला कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, राजकीय व सामाजिक क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

सौ. योगिता वाघ या सामाजिक जाणीव ठेवून कार्य करणाऱ्या, सर्वसामान्य महिलांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठविणाऱ्या आणि संघटनात्मक कामात सक्रिय सहभाग घेणाऱ्या कार्यकर्त्या म्हणून ओळखल्या जातात. पक्षनिष्ठा, संघटन कौशल्य आणि महिलांना एकत्रित करण्याची क्षमता यामुळे पक्षश्रेष्ठींनी त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे.



भडगाव शहरातील महिला सक्षमीकरण, सामाजिक उपक्रम, जनसंपर्क आणि पक्षविस्तारासाठी त्या प्रभावीपणे काम करतील, असा विश्वास भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. त्यांच्या निवडीमुळे महिला आघाडीला नवसंजीवनी मिळणार असल्याचेही बोलले जात आहे.

योगिता वाघ यांच्या राजकीय आणि सामाजिक प्रवासामागे त्यांचे पती अनिल वाघ हे खंबीरपणे उभे असल्याचे सर्वत्र बोलले जाते. समाजकारण असो वा राजकारण, प्रत्येक टप्प्यावर त्यांनी योगिता वाघ यांना मोलाची साथ दिली आहे. अनिल वाघ हे स्वतः उत्कृष्ट वक्ते म्हणून ओळखले जात असून, सामाजिक प्रश्नांवर प्रभावी मांडणी करण्याची त्यांची शैली विशेष मानली जाते.

राजकीय क्षेत्रात डॅशिंग नेतृत्व म्हणून ओळख निर्माण केलेले अनिल वाघ हे विविध सामाजिक उपक्रमांमध्ये नेहमी सक्रिय भूमिका बजावत असतात. त्यांच्या नेतृत्वगुणांचा आणि जनसंपर्काचा लाभ योगिता वाघ यांना आगामी काळात निश्चितच होणार असल्याची चर्चा कार्यकर्त्यांमध्ये रंगली आहे.

दरम्यान, योगिता वाघ यांच्या नियुक्तीनंतर भडगाव शहरात भाजपा महिला संघटन अधिक मजबूत होईल, तसेच महिला कार्यकर्त्यांना नवे नेतृत्व आणि दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. त्यांच्या पुढील कार्यकाळाकडे आता संपूर्ण भडगाव शहराचे लक्ष लागले आहे.

---

## अर्धवट महामार्गावर टोल कशासाठी?

### संतोष पटकारे यांचा सरकारला थेट सवाल

**मुंबई-गोवा महामार्गावरील टोल वसुली तात्काळ बंद करण्याची मागणी**




मुंबई : मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील टोल वसुली तात्काळ बंद करण्यात यावी, अशी जोरदार मागणी ऑल इंडिया धनगर समाज महासंघाचे मुंबई प्रदेशाध्यक्ष संतोष पटकारे यांनी महाराष्ट्र शासन तसेच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पत्रकाद्वारे केली आहे.




१५ मेपासून खारपाडा टोलनाका अचानक सुरू करण्यात आल्याने कोकणवासीयांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. स्थानिक नागरिकांना विश्वासात न घेता टोल वसुली सुरू करण्यात आल्याचा आरोप पटकारे यांनी केला आहे. अनेक वर्षांपासून रखडलेल्या व अपूर्ण अवस्थेतील मुंबई-गोवा महामार्गामुळे शेकडो अपघात झाले असून हजारो प्रवाशांना जीव गमवावा लागल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील पळस्पे ते इंदापूर दरम्यानच्या ८४ किलोमीटर मार्गाचे रुंदीकरण आजही पूर्ण झालेले नाही. २००९ मध्ये सुरू झालेला हा प्रकल्प २०१४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. सुरुवातीला ९२२ कोटी रुपयांचा असलेला प्रकल्प खर्च वेळेत काम पूर्ण न झाल्याने तब्बल १२०० कोटींवर पोहोचल्याचे पटकारे यांनी नमूद केले. निकृष्ट दर्जाचे काम व रखडलेले बांधकाम यामुळे प्रवाशांचे हाल होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

ऑल इंडिया धनगर समाज महासंघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष प्रवीण काकडे तसेच मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग संघर्ष समितीचे समन्वयक सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन उभारण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. खारघर टोलनाक्याप्रमाणे या टोलनाक्यावरही खाजगी वाहनांना संपूर्ण टोलमुक्ती देण्यात यावी, अशी मागणी करत समस्त कोकणवासीयांनी एकत्र येऊन लढा उभारण्याची वेळ आल्याचे पटकारे यांनी म्हटले आहे. संपूर्ण महाराष्ट्रासह मुंबई, ठाणे, गुजरात आणि उत्तर महाराष्ट्रातील हजारो प्रवासी दरवर्षी गोव्याकडे प्रवास करतात. त्यामुळे महाराष्ट्र शासन व स्थानिक लोकप्रतिनिधींनी तातडीने लक्ष घालून कोकणवासीयांना न्याय द्यावा, अशी मागणी संतोष पटकारे यांनी केली आहे.

## विकासाच्या वाटेवर भडगावची झेप ; आधुनिक नमो गार्डनचे भूमिपूजन उत्साहात

**भडगावला मिळणार आधुनिक विरंगुळ्याचे नवे आकर्षण**


भडगाव प्रतिनिधी : शहराच्या विकासात आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत प्रभाग क्रमांक ८ मध्ये आधुनिक सुविधांनी सुसज्ज अशा ‌‌नमो गार्डनचे भूमिपूजन उत्साहात पार पडले. नागरिकांना विरंगुळा, स्वच्छ वातावरण व मनोरंजनाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा प्रकल्प साकारला जात असून शहराच्या सौंदर्यातही मोठी भर पडणार आहे.

या आकर्षक गार्डनचे भूमिपूजन नगराध्यक्ष रेखाताई मालचे, उपनगराध्यक्ष राजेंद्र पाटील, पंचायत समितीचे गटनेते सुभाष पाटील, भडगाव पालिकेचे गटनेते लखीचंद पाटील, बांधकाम सभापती नगमा बी. अलीम शहा तसेच प्रभाग क्र. ८ चे नगरसेवक अमोल पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमास शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नगरसेवक युवराज पाटील, विजयकुमार भोसले, संतोष पाटील, विशाल मालचे, डॉ. प्रमोद पाटील, सुधाकर पाटील, समाधान पाटील, रघुनाथ पाटील, प्रकाश भंडारी, महेंद्र ततार, निशांत सोमवंशी, सागर शेंडे, प्रीतम भंडारी, गोविंद मारवाडी यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी नमो गार्डनच्या माध्यमातून भडगाव शहराला आधुनिक आणि सुंदर विरंगुळा केंद्र मिळणार असल्याचे सांगितले. लहान मुलांसाठी खेळण्याची सुविधा, ज्येष्ठ नागरिकांसाठी बसण्याची व्यवस्था तसेच स्वच्छ व हिरवाईयुक्त वातावरणामुळे हे गार्डन नागरिकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

शहराच्या विकासकामांना गती मिळत असून नागरिकांसाठी दर्जेदार सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न सातत्याने सुरू असल्याचेही यावेळी मान्यवरांनी नमूद केले.

साकार समाज...राष्ट्राची दक्षता...
PRGI No.MHMAR/26/A2040
साप्ताहिक सूक्ष्मलोक आवाहन
संपर्क कार्यालय
जळगाव जिल्ह्यातील सर्व सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, कृषी, धार्मिक, सांस्कृतिक तसेच जनहिताच्या ताज्या घडामोडी अधिक व्यापकपणे जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी आपण जाहिराती, बातम्या, प्रसिद्धीपत्रके, उपक्रमांची माहिती, वाढदिवस, सत्कार समारंभ, निवेदने, विविध योजनांची माहिती तसेच छायाचित्रे प्रसिद्धीसाठी वेळोवेळी आमच्याकडे पाठवावीत.

आपण केलेले विकासकार्य, सामाजिक उपक्रम व लोकहिताचे निर्णय हे "साकार समाज... राष्ट्राची दक्षता..." या ध्येयवाक्यासह जनतेपर्यंत पोहोचविण्याचे कार्य साप्ताहिक सूक्ष्मलोक माध्यमातून प्रभावीपणे करण्यात येईल.
संपादक : विठ्ठल कौतिक पाटील | Mo. 9423159516 | Email : vitthalpatil122@gmail.com
पत्ता : ASSK तहसिल कार्यालय,भडगाव जि. जळगाव महा. (४२४१०५)

साकार समाज... राष्ट्राची दक्षता...साप्ताहिक सूक्ष्मलोक
भारत सरकार नोंदणी क्रमांक : PRGI NO : MHMAR/26/A2040
मालक, प्रकाशक व संपादक : विठ्ठल कौतिक पाटील यांनी, ASSK तहसिल कार्यालय भडगाव, ता. भडगाव, जि. जळगाव, महाराष्ट्र- 424105 येथे प्रकाशित केले.
मोबा. : 9423159516 ई-मेल : vitthalpatil122@gmail.com
मुद्रक : विजय भिकन महाले यांचे मुकेश ऑफसेट अँड प्रिंटर्स, H. No. 7, शेतकी संघ कॉम्प्लेक्स, भडगाव रोड, पाचोरा, जि. जळगाव, महाराष्ट्र - 424201 येथे मुद्रित केले.
सूक्ष्मलोक मध्ये प्रकाशित होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती, निवेदने व इतर मजकुरातील मते, दावे व आशय यांची सर्वस्वी जबाबदारी संबंधित लेखक, प्रतिनिधी व जाहिरातदार यांची राहील. प्रकाशित मजकुराशी मालक, प्रकाशक व संपादक सहमत असतीलच असे नाही. या वृत्तपत्रासंबंधी उद्भवणाऱ्या सर्व कायदेशीर बाबींकरिता जळगाव जिल्हा न्यायालयाचे न्यायक्षेत्र लागू राहील.